


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ०२३ ● पुणे ● रविवार, दि. ०१ डिसेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



तहसीलदारांकडे मागितली दहा लाखांची खंडणी 3



'संगीत मानापमान'चा म्युझिक लाँच सोहळा दिमाखात संपन्न 4

# पुणे जिल्ह्यात ११ पराभूत उमेदवारांनी केली मतदान यंत्रांच्या पडताळणीची मागणी

## सहा जानेवारीनंतर होईल चित्र स्पष्ट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विधानसभा निवडणुकीत मतमोजणीत घोळ झाल्याच्या आरोपानंतर जिल्ह्यातील तब्बल 11 मतदारसंघांतील पराभूत उमेदवारांनी मतदान यंत्रांची पडताळणी करण्यासाठी अर्ज केला आहे. या 11 उमेदवारांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे 8 व काँग्रेसच्या 3 उमेदवारांचा समावेश आहे. या अर्जानंतर 45 दिवसांच्या न्यायालयीन याचिकेचा कालावधी संपल्यानंतर, अर्थात 6 जानेवारीनंतर संबंधित यंत्रांमधील मतांची माहिती नष्ट केली जाईल. त्यानंतर मॉकपोलच्या आधारे 1 हजार 400 मतांची पडताळणी करून यंत्रांची सत्यता पडताळली जाईल, असे जिल्हा निवडणूक शाखेतील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार फेरमतमोजणी व्हावी यासाठी न्यायालयात जाणार असल्याचे जगताप यांनी सांगितले. जिल्ह्यातील 11 मतदारसंघांमधील 11 पराभूत उमेदवारांमध्ये शिरूरमधील अशोक पवार, बारामतीतील युगेंद्र पवार, हडपसरमधील प्रशांत जगताप, चिंचवडमधील राहुल कलाटे, खडकवासलामधील सचिन दोडके, पर्वतीमधील अश्विनी कदम, भोसरीमधील अजित गव्हाणे, तर दौंडमधील रमेश थोरात यांचा समावेश आहे. तर पुणे



कॅन्टोन्मेंटमधील रमेश बागवे, पुरंदरमधील संजय जगताप व भोरमधील संग्राम थोपटे यांनीही अर्ज केला आहे. हा अर्ज करताना संबंधित मतदारसंघामधील एकूण मतदान केंद्रांच्या 5 टक्के केंद्रांच्या यंत्रांची पडताळणी केली जाते. ही यंत्रे उमेदवाराकडून सुचविली जातात. या मतदान केंद्रातील यंत्रांची पडताळणी करण्यासाठी प्रत्येकी 42 हजार 500 रुपये अधिक 18 टक्के जीएसटी आकारून एकूण 47 हजार 200 रुपये आकारले जातात. त्यानुसार या सर्व उमेदवारांनी 64 लाख 66 हजार 400 रुपये जिल्हा निवडणूक शाखेकडे जमा केले आहेत.

| उमेदवार | मतदारसंघ | यंत्रांची संख्या | भरलेले शुल्क (रुपयांत) |
|---|---|---|---|
| ● अशोक पवार | शिरूर | १२ | ५६६४०० |
| ● प्रशांत जगताप | हडपसर | २७ | १२७४४०० |
| ● रमेश बागवे | पुणे कॅन्टोन्मेंट | ९ | ४२४८०० |
| ● राहुल कलाटे | चिंचवड | २५ | ११८०००० |
| ● सचिन दोडके | खडकवासला | २ | ९४४०० |
| ● युगेंद्र पवार | बारामती | १९ | ८९६८०० |
| ● अश्विनी कदम | पर्वती | २ | ९४४०० |
| ● अजित गव्हाणे | भोसरी | १० | ४७२००० |
| ● संजय जगताप | पुरंदर | २१ | ९९१२०० |
| ● संग्राम थोपटे | भोर | ६ | २८३२०० |
| ● रमेश थोरात | दौंड | ४ | १८८८०० |
| एकूण ११ | | १३७ | ६४६६४०० |

## पिंपरी-चिंचवड : तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून तरुणाने केली आत्महत्या



**भोसरी (दै. आरंभ पर्व)**

इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून तरुणाने आत्महत्या केली. ही घटना बुधवारी (दि. 27) दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास इंद्रायणीनगर भोसरी येथे घडली. सिद्धार्थ अभिजीत जगदाडे (वय 20, रा. इंद्रायणीनगर, भोसरी) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ जगदाडे याने राहत्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारली. त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला भोसरी येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मृत्यूचे कारण समजू शकले नाही. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करीत आहेत.




# लिव्ह इन प्रकरणातून महिलेचा खून

## मृतदेह फेकला खंबाटकी घाटात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या महिलेची हत्या करून, तीन वर्षांच्या मुलाला आळंदी येथे बेवारस सोडून आरोपी पसार झाला होता. त्यापूर्वी त्याने महिलेचा मृतदेह खंबाटकी घाटात फेकून दिल्यावर स्वतः पोलीस ठाण्यात जाऊन महिला बेपत्ता झाल्याची नोंद केली होती. मात्र, संबंधित महिलेच्या वर्णनाशी मिळताजुळता मृतदेह मिळाला आणि पोलिसांना तिच्या लिव्ह इन पार्टनरला अटक केली. दिनेश ठोंबरे असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. तर जयश्री मोरे असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. सतत पैसे मागणे आणि चारित्र्याच्या संशयावरून हा खून झाल्याचा पोलिसांना अंदाज आहे. दिनेशने लिव्ह इनमध्ये असताना जन्माला आलेल्या तीन वर्षीय मुलाला आळंदीत बेवारस सोडून दिले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनेश आणि जयश्री गेल्या पाच वर्षांपासून वाकडमध्ये लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहात होते. त्यांना तीन वर्षांचा मुलगादेखील आहे. दिनेशचे लग्न झालेले असून त्याला पहिल्या पत्नीपासून दोन मुले आहेत. जयश्रीचा सात वर्षांपूर्वी विवाह झालेला होता. जयश्री पतीसोबत राहात नव्हती. जयश्री आणि दिनेशचे काही दिवसांपासून पटत नव्हते. जयश्री नेहमी दिनेशकडे पैशांची मागणी करत असे त्याबरोबरच सारखे राहण्याबद्दल आग्रह करीत असे. 24 नोव्हेंबर रोजी भूमकर चौकात गाडीत दोघांमध्ये वाद झाले. त्यानंतर दिनेशने गाडीतील हातोडीने जयश्रीच्या डोक्यात घाव घातले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या जयश्रीचा काही वेळातच जीव गेला.









# हेल्मेट सक्ती करा, पण आधी रस्ते नीट करा...



राज्य पोलिसांनी हेल्मेटबाबत पुन्हा एकवार कडक भूमिका घेण्याचा निर्धार केलेला दिसत आहे. दुचाकी वाहनावर बसणाऱ्या चालकाला व त्यापाठीमागे बसणाऱ्या प्रवाशाला हेल्मेट सक्तीचे निर्देश दिले आहेत. हेल्मेट सक्ती ही दुचाकीस्वाराच्या जीवितासाठी अत्यावश्यक बाब असली तरी या निर्देशाची अंमलबजावणी करण्याआधी पोलिसांनी सर्वच बाबींचा सखोल विचार करणे आवश्यक होते. मुळातच मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक अशा सर्वच शहरामध्ये आता घरटी दुचाकीचे प्रमाण वाढू लागले आहे. काही घरांमध्ये दोन ते तीन दुचाकीही पाहावयास मिळू लागल्या आहेत. घरामध्ये पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून महिलाही दुचाकी चालवू लागल्याने दुचाकीच्या मार्केटमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. लोकांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने भौतिक सुखाच्या संकल्पना बळावल्या आहेत. सार्वजनिक प्रवासी सुविधा पुरवणाऱ्या वाहनांकडे कानाडोळा करत स्वमालकीच्या दुचाकी तसेच चारचाकी वाहनातून प्रवास करण्याकडे आता अनेकांचा कल वाढू लागला आहे. चारचाकी वाहनेदेखील सेंकडहॅण्डमध्ये दीड-दोन लाखांमध्ये उपलब्ध होऊ लागल्याने घरोघरी दुचाकी पाठोपाठ चारचाकी वाहने मोठ्या संख्येने दिमाखात उभी राहू लागली आहेत. दुचाकी व चारचाकी वाहनांच्या विक्रीचा आलेख गगनभरारी घेत असला तरी रस्त्यांची संख्या वाढली का? रस्त्यावरील खड्ड्यांची संख्या कमी झाली का? पदपथावरून फेरीवाल्यांचे पूर्णपणे उच्चाटन होऊन पादचाऱ्यांना ये-जा करण्यासाठी पदपथ मोकळे झाले का? वाहनांच्या वाढत्या संख्येच्या तुलनेत या वाहतूक व्यवस्थेला नियंत्रित करण्यासाठी वाहतूक पोलिसांच्या संख्येत वाढ झाली का? या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मुळात हेल्मेट सक्ती याचा या बाबींशी प्रत्यक्षात जरी संबंध येत नसला तरी या बाबी कळत-नकळत एकमेकांशी जोडल्या गेल्या आहेत, हे नाकारूनदेखील चालणार नाही. हेल्मेट सक्तीचा निर्णय घेण्यापूर्वी वाहनांच्या तुलनेत सरासरी दोन प्रवाशांचा विचार केल्यास बाजारामध्ये तितक्या संख्येने हेल्मेट विक्रीसाठी उपलब्ध आहेत का, याचाही आढावा घेणे आवश्यक होते. निर्णय घेता येतो, पण त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यापूर्वी आपण घेतलेल्या निर्णयाच्या दृष्टीने अंमलबजावणीसाठी येणाऱ्या अडथळ्यांचे निवारण करणे हेदेखील प्रशासनाचे कर्तव्य आहे. अनेक भागांतील वाहतूक व्यवस्था ही रस्त्यावरील सिग्नलवर अवलंबून असते. सिग्नल बंद पडल्यास अथवा सिग्नल यंत्रणेमध्ये बिघाड झाल्यास वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडतो व त्यातून वाहतूक कोंडीचा उद्रेक होतो. दुचाकी वाहनांचे होत असलेले अपघात पाहता चालक व चालकांसोबत असलेल्या प्रवाशांच्या जीवितरक्षणासाठी हेल्मेट सक्तीच्या निर्णयाचे समर्थन पोलिसांकडून करण्यात येत आहे. दुचाकी वाहनांचे अपघात हे वर्दळीच्या ठिकाणीच अधिक होतात. वर्दळीच्या ठिकाणी म्हणजे रस्त्यावर वाहनांच्या संख्येने नागरिकांची होत असलेली ये-जा अपघाताला निमंत्रण देत असते, खतपाणी घालत असते. रस्त्यालगत असलेल्या पदपथावर फेरीवाल्यांचे अतिक्रमण असल्याने पादचाऱ्यांना पदपथावर ये-जा करणे अवघड झाले आहे. फेरीविक्रेते व त्यांचे ग्राहक याचीच वर्दळ पदपथावर असते. पदपथ हे फेरीविक्रेत्यांचे व्यवसायाचे केंद्र बनले आहे. त्या-त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यात अपयश आले आहे. मुळातच पालिका, नगरपालिका प्रशासनातील अतिक्रमण विभागातील त्या-त्या संबंधितांचे फेरीवाल्यांकडून नियमित स्वरूपात खिसे भरले जात असल्याने पदपथावरील फेरीवाल्यांना प्रशासकीय घटकांकडूनच आश्रय मिळत गेला. न्यायालयाने पदपथ फेरीवाल्यांच्या अतिक्रमणातून मुक्त करण्यासाठी आदेश देऊनही या आदेशाची अंमलबजावणी होत नाही. कारण न्यायालयीन निर्णयाची अंमलबजावणी करण्यापेक्षा फेरीवाल्यांकडून नियमित मिळणारा आर्थिक मलिदा हा प्रशासकीय यंत्रणेला महत्त्वाचा वाटत आहे. फेरीवाल्यांनी पदपथ बळकावल्यामुळे रहिवाशांना ये-जा करण्यासाठी रस्त्यावरच यावे लागते. रस्त्यावर आधीच वाहनांची वाढलेली संख्या तसेच रस्त्यावरूनच सुरू असलेली लोकांची ये-जा यामुळे वाहने हाकणे दुचाकीस्वारांना अवघड होऊन बसते. रस्त्यावरील लोकांचा चुकविताना व अन्य वाहनांपासून आपले वाहन गर्दीतून बाहेर काढणे एक प्रकारचे अग्निदिव्यच होऊन बसले आहे. त्यामुळे तोल जाणे, अन्य वाहनांना ठोकर देणे, रस्त्यावरील नागरिकांना ठोकर देणे या घटनांना नकळत खतपाणी मिळत जाते आणि रस्ते मात्र अपघातांमुळे बदनाम होतात. त्या-त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी पदपथ फेरीवालामुक्त केल्यास रस्त्यावरील अपघातांना बऱ्याच प्रमाणात आळा बसेल. रस्त्यावरील खड्डे हे वाहतूक कोंडीचे व रस्त्यावरील अपघातांचे प्रमुख कारण आहे. पावसामध्ये रस्त्यावर खड्डे पडत असले तरी ते बुजविण्यात उदासीनता दाखविली जाते. विविध केबल्स टाकण्यासाठीदेखील रस्त्यांचे खोदकाम होते. जलवाहिन्या, मलनिस्सारण वाहिन्या टाकण्यासाठी खोदकाम करण्यात येते. हे खोदकाम, रस्त्यावर पडलेले खड्डेदेखील अपघातांना निमंत्रण देतच असतात. अनेकदा खड्डे बुजवण्यासाठी पेव्हर ब्लॉक जरी वापरले जात असले तरी खड्ड्यात ते पेव्हर ब्लॉक दबले जात असल्याने रस्ते समपातळीऐवजी वरखाली झालेले दिसून येतात. अपघात झाल्यावर जीविताच्या रक्षणासाठी हेल्मेट दुचाकीचालकांसाठी व मागे बसलेल्या सहप्रवाशांसाठी आवश्यक बाब असली तरी अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. हेल्मेट सक्ती करण्यापूर्वी बाजारात त्या संख्येने हेल्मेट विक्रीसाठी उपलब्ध आहेत का, याचा आढावाही पोलीस यंत्रणेने घेणे आवश्यक आहे. एकीकडे रस्त्यावर असलेली वाहतूक, पोलिसांचा अभाव, सिग्नल यंत्रणेतील बिघाड याही समस्येचे निवारण करण्याची प्रशासनाची जबाबदारी आहे. पदपथ फेरीवालेमुक्त, खड्डेमुक्त रस्ते, सदोष सिग्नल यंत्रणा, वाहतूक पोलिसांची उपलब्धता याची अंमलबजावणी झाली तरी किमान 85 ते 90 टक्के अपघातांना आळा बसण्यास मदत होईल. आधी बाजारात हेल्मेट उपलब्ध करून द्या, मग सक्ती करा, असा सूर आताच वाहनचालकांकडून आळविला जात आहे.



# चालत्या पीएमपीएमएल बसचे टायर फुटले

## पुण्यातील राजाराम पुलाजवळील दुर्घटना : चालकाच्या सावधानतेमुळे शेकडो प्रवाशांचा जीव वाचला!

- माजी उपमहापौर अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांच्याकडून बसफेऱ्या वाढवण्याची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील सर्वात प्रवासी संख्या वाहतूक करणाऱ्या पीएमपीएमएल सेवा ही सोयीची सेवा आहे. मात्र या सेवेवर प्रवाशांचा अतिरिक्त ताण पडत आहे.

काल अशीच घटना राजाराम पुल येथे घडली. स्वारगेट कडून धायरीतील रायकर मळ्याकडे जाणाऱ्या (MH 12 QG 1688) ह्या धावत्या बसचे पाठीमागील टायर फुटले.

प्रवाशांनी गच्च भरलेली ही बस चालकाने सावधानता बाळगल्याने शेकडो प्रवाशांचा जीव वाचला. अन्यथा मोठा अपघात झाला असता. पुणे शहरातील धायरी व सिंहगड रोड परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकीकरण झाल्यामुळे इकडे प्रवाशांची संख्या मोठी आहे.

बसच्या टायर फुटणे विषयी चालकांशी संपर्क साधला असता अनेक बसेस या जुन्या बसेस आहेत , शिवाय मोठ्या प्रमाणात प्रवासी संख्या असल्यामुळे ही अतिरिक्त ताण पडतो. त्यामुळे अशा दुर्घटना घडल्या जातात.

यामुळे शेकडो प्रवाशांचा जीव भांड्यात पडला. पुणे परिवहन खात्यांकडे अनेक बसेस यांना दुरूस्त अवस्थेतील असून त्या बसेस आहे त्या अवस्थेमध्ये बसेस अपुऱ्या पडत असल्यामुळे तात्पुरती उपाययोजना करून बसेस मार्गावर प्रवाहित केले जातात.

या मार्गावरील नवीन नवीन बसेस कधी येणार याकडे प्रवाशांनी लक्ष वेधले आहे यावेळी हक्काचा म्हणून ओळख असलेले अ‍ॅड.माजी उपमहापौर प्रसन्नदादा जगताप यांनी सदर घटनेची माहिती घेऊन पी एम पी एल च्या अधिकाऱ्यांना संपर्क साधला. व या भागामध्ये नवीन बसेस व फेऱ्या वाढवण्याची मागणी केली आहे. स्वारगेट कडून धायरीकडे जाणाऱ्या बसेसवर अतिरिक्त ताण पडतोय.. प्रशासन लक्ष देणार का हे पाहणं महत्वाचे आहे.मेट्रोसेवेबरोबरच परिवहन सेवेकडे ही लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.






धायरी सिंहगड रोड, नऱ्हे सन सिटी मार्गावर जास्त प्रवासी संख्या असल्यामुळे बसेसची संख्या वाढवली पाहिजे. आणि चांगल्या बसेस ह्या मार्गावर पाठवणे गरजेचे आहे. ह्या बाबत पीएमपीएमएल च्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून मागणी केली आहे. त्यांच्याकडे अशा दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

**- अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप, माजी उपमहापौर, पुणे मनपा**

## यशस्वी राजकारणासाठी

राजकारणात यशस्वी होण्यासाठी नेमके काय कराव लागतं ?
थोडस वाकावं लागत ,थोडस झुकाव लागतं ,
चार पावलं मागही सराव लागत
अन आयत्या संधीची वाट पाहत राहावं लागतं
जो नाही कधी वाकला ,
नाही कोणासमोर झुकला तो मुळासकट तुटला
अन राजकारणातून तर कायमचाच हुकला,
अन राजकारणात यशस्वी होण्यासाठी
नेमके काय कराव लागतं ?
सत्ता सुंदरीमाग धावावं लागतं
धावताना मात्र संन्यासीपण भासवाव लागतं ,
भगवं वस्त्रही परिधान करावं लागतं ,
अन भगव्याच तोकड प्रेम दाखवाव लागत ,
बेगडी गांधीपण आणावं लागतं ,
त्यासाठी खादीच आंगड घालाव लागत ,
नेत्याच्यामागे घुटमळाव लागतं ,
लक्ष मात्र कायमच खुर्चीवर ठेवाव लागतं
खरच राजकारणात यशस्वी होण्यासाठी
नेमके काय कराव लागतं ?
स्वकियांशी बंड कराव लागतं ,
बंडाला मात्र क्रांतीच नाव द्याव लागतं ,
खेकड्यासारख वागाव लागतं ,
अन त्यातून स्वार्थ साधावा लागतो ,
जनतेच्या भावनांशी खेळावं लागतं ,
मंदिर-माजिदीसाठी भांडावं लागतं ,
आश्वासने भरघोस द्यावी लागतात
कामे मात्र निवडणुकीच्या आधीच करावी लागतात ...,
खरच राजकारणात यशस्वी होण्यासाठी
नेमके काय कराव लागतं ?
मरसडीजमधून फिरून छाप पाडावी लागते,
गरिबांसाठी विकासाची थाप मारावी लागते
न केलेल्या कामाचे श्रेय लाटाव लागतं ,
प्रतिस्पर्ध्याशी कायमच झटाव लागत ,
हे सर्व काही करत असताना
मात्र जनतेच्या खाल्या मिठलाही थोडस जागाव लागतं ,
नाही तर चाणाक्ष जनतेमुळे सत्तेतून पायउतारही व्हाव लागत......

## पुढारी राजा

उधळत होते फुलं आणि गुलाल
कुणाचे झाले हाल ,तर कुणी झाले मालामाल,
वाजत होता बँडबाजा
कराव निवडून आला होता पुढारी राजा ।।१।।
पंचायतीच्या ओट्यावर झाला सभारंभ
पुढारी म्हणाले मी करीन विकासाचा प्रारंभ ,
मिशीला पिळ भरत पुढारी तावाने बोलत होते
माणसेही तंबाखू मळत समाधानाने डोलत होते ।।२।।
पण काही दिवसातच लोभाचा पाऊस पडला
पुढाऱ्यांचा प्रामाणिकपणा त्यात बराच सडला
लाचारीच पाणी पंचायतीतून दिल्लीत मुरलं
भल्या भल्या पुढाऱ्यांना त्याने भलताच घेरलं ।।३।।
भ्रष्टाचाराचं रुजलं सगळीकडे मोठ बीज
त्यानेच तर घालविली दिव्याची वीज,
खुली अर्थव्यवस्था भारतात आणली
शेतकऱ्यांची तिने तर पाठच तुडविली ।।४।।
हातात स्व 'देशी ' घेवून पुढारी नाचत होते
शेतकरी मात्र ऊर बडवून रडत होते,
पाच वर्षे संपलीत तेव्हा पुढारी गावात आले
पुन्हा तोच सभारंभ आणि तेच भाषण झाले ।।५।।
राजे ...
ज्या बुलंद भारतासाठी तुम्ही
खाल्ल्यात खस्ता
त्याच बुलंद भारताची
या भ्रष्ट पुढाऱ्यांनी केली
ही दुरावस्था ।।६।।



**प्रा. योगेश अशोकराव हांडगेपाटील.**
कात्रज, पुणे ४११०४६
मोबाईल नं. 9423077963



# योगेश कांचन यांची युवक अध्यक्षपदी निवड

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

योगेश उत्तम कांचन पाटील यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शिरूर -हवेली विधानसभा युवक अध्यक्षपदी निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते माजी उपमुख्यमंत्री विद्यमान आमदार अजित पवार यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी पुणे जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष आण्णासाहेब महाडिक यांनी सदरची निवड केली.

# अभिनवच्या एन एस एस विभागातर्फे शहिदांना श्रद्धांजली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आंबेगाव बु ।।येथील अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमधील एन एस एस विभागातर्फे 26/11 मध्ये दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या वीर बांधवाना साश्रुनयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी एन एस एस च्या विद्यार्थ्यांनी आपल्या जीवाची बाजी लावून दहशतवाद्यांना कंठस्नान घालता घालता आपला जीव गमावणाऱ्या शहिदांना पुष्पांजली अर्पण करून भारतमातेच्या रक्षणासाठी सर्वार्थाने झटण्यासाठी कटिबद्ध राहण्याची प्रतिज्ञा सोहम बिवलकर, कावेरी बांगर,अनुश्री काकडे या एन एन एस स्वयंसेवकांनी केली.

खजिनदार ध्रुव जगताप यांनी भारत मातेला समृद्ध करण्यासाठी आजचे तरुण 26 11 मध्ये शहीद झालेल्या जवानांचे बलिदान कधीच व्यर्थ जाणार नाही याची दक्षता घेण्याचे आश्वासन दिले तर संस्थापक राजीव जगताप यांनी संविधान दिनानिमित्त संविधानाचे जतन करण्यासाठी प्रत्येकाने कटिबध्द राहिले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

ज्युनिअर कॉलेजच्या पर्यवेक्षिका सुनीता यादव, कार्यक्रम अधिकारी विनोदकुमार बंगाळे आणि मनोज कुमार भकत आणि सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली एन एस एस स्वयंसेवकांच्या सहकार्याने उपक्रम राबवला. यावेळी संस्थापक अध्यक्ष राजीव जगताप ,सेक्रेटरी सुनीता जगताप,सहसेक्रेटरी निर्मोही जगताप,प्राचार्या वर्षा शर्मा उपस्थित होते.




# संमेलनाध्यक्षपदी डॉ. श्रीपाल सबनीस यांची निवड : शरद गोरे यांची माहिती

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयेजित 16 डिसेंबर 2024 रोजी मौलाना अब्दुल कलाम सभागृह कोरेगाव पार्क, पुणे येथे होणाऱ्या 16 व्या छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी डॉ.श्रीपाल सबनीस यांची निवड करण्यात आल्याची माहिती साहित्य परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे यांनी दिली. छत्रपती संभाजी यांच्या साहित्यिक पैलूंचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून या संमेलनाचे आयोजन दरवर्षी विविध ठिकाणी करण्यात येते. सबनीस यांनी एकूण 45 हून अधिक ग्रंथाचे विपूल लेखन केले असून त्यामध्ये सामाजिक,



ऐतिहासिक, शैक्षणिक, ग्रामीण, प्रबोधनात्मक, चिंतनात्मक, धर्मशास्त्र, जीवनशास्त्र, आदी विषयांचा समावेश आहे. पिंपरी चिंचवड येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना सह त्यांनी आजवर 40 हून अधिक विविध साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषिवले आहे. त्यांच्या अमोघ वाणीतून त्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध तर केलेच त्याबरोबर वास्तवाचे नवे आत्मभान हि दिले. राज्य शासनाच्या पुरस्कारांसह आजवर शेकडो पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. ग्रंथपूजनाने या साहित्य संमेलनाची सुरुवात होणार असून त्यानंतर उद्घघाटन समारंभ, परिसंवाद, कविसंमेलन, चर्चासत्र, व संमेलनाचा समारोप असे स्वरूप असणार आहे.

# स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक पहिल्यांदाच एकत्र

## पुढील वर्षी प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाच्या चित्रीकरणाला धडाक्यात सुरुवात



**मुंबई-पुणे (दै. आरंभ पर्व)**

नुकताच मुहूर्त झाल्यानंतर ‘सुशीला-सुजीत’च्या चित्रीकरणाला धडाक्यात सुरुवात झालेली आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक हे पहिल्यांदाच एकत्र येत असून चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाची दोन महिन्यांपूर्वी घोषणा झाल्यानंतर या चित्रपटाबद्दल रसिक आणि चित्रपटसृष्टीत मोठी उत्कंठा लागून राहिली आहे.

चित्रपटाच्या नावापासून सुरु झालेली उत्कंठा या चित्रपटात सुशीला कोण आणि सुजीत कोण या बहुचर्चित प्रश्नापर्यंत ताणली गेली होती. मात्र या दोन भूमिकांमध्ये कोण असणार याचे उत्तर देताना निर्मात्यांनी सुशीलाच्या भूमिकेत सोनाली कुलकर्णी असेल तर सुजितच्या भूमिकेत स्वप्नील जोशी असेल असे नुकतेच जाहीर केले आहे. आता चित्रपटाशी संबंधीत आणखीही काही नाविन्यपूर्ण गोष्टींच्या घोषणा व्हायच्या आहेत.

स्वप्नील जोशी, प्रसाद ओक, मंजिरी ओक, संजय मेमाणे, निलेश राठी यांची निर्मिती असलेल्या ‘सुशीला-सुजीत’चा मुहूर्त गेल्या आठवड्यात श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेवून पार पडला आणि त्याच्या चित्रीकरणालाही धडाक्यात सुरुवात झाली आहे.

स्वप्नील जोशी आणि प्रसाद ओक हे दोन अभिनेते मित्र पहिल्यांदाच या चित्रपटाच्या निमित्ताने एकत्र येत आहेत. शिवाय स्वप्नील,सोनाली आणि प्रसाद पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करत असल्याने चित्रपटाबद्दल खूप उत्सुकता आहे. बिग ब्रेन प्रॉडक्शन्स आणि पंचशील एन्टरटेन्मेंट्सची ही निर्मिती आहे. प्रसाद ओक, स्वप्नील जोशी, सिनेमॅटोग्राफर संजय मेमाणे हे पहिल्यांदाच एकत्र येवून चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. प्रसाद ओक हे चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत तर संजय मेमाणे हे सिनेमॅटोग्राफर असून हे एक यशस्वी कॉम्बिनेशन मानले जाते. पटकथा-संवाद अजय कांबळे यांचे आहेत. चित्रपट 2025 मध्ये प्रदर्शित होणार आहे.

“सोनाली कुलकर्णी, प्रसाद ओक आणि मी पहिल्यांदाच एकत्र येत असून या चित्रपटामुळे तो योग जुळून आला आहे. माझ्यासाठी हे खूप एक्सायटींग आहे आणि या चित्रपटात खूप सर्जनशील गोष्टी घडणार आहेत आणि तो एक ऊर्जाभारा अनुभव असणार आहे,” असे उद्गार स्वप्नील जोशी यांनी काढले आहेत.

सोनाली कुलकर्णी म्हणाल्या, “स्वप्नील आणि मला बऱ्याच दिवसांपासून एकत्र काम करायचे होते. जेव्हा प्रसादने मला ही कथा ऐकवली आणि सांगितले कि स्वप्नीलसुद्धा या चित्रपटात असणार आहे. हे ऐकल्यावर मी आनंदाने अक्षरशः उडीच मारली.”

“सोनाली आणि स्वप्नील हे थोडेसे वेगळे आणि फ्रेश असे कास्टिंग या चित्रपटासाठी आम्ही केले आहे. या दोघांची एक वेगळी अशी काम करण्याची पद्धत आहेत आणि त्यामुळे ही निर्मिती प्रक्रिया अत्यंत इंटरेस्टिंग होणार आहे,” असे उद्गार प्रसाद ओक यांनी काढले.

या आगामी चित्रपटात कित्येक गोष्टी पहिल्यांदाच साध्य होत आहेत. सोनाली आणि स्वप्नील पहिल्यांदाच एकत्र येत आहेत. शिवाय सोनाली, प्रसाद आणि स्वप्नील हे तीन गुणवान आणि आघाडीचे कलाकारही पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत.

सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक यांच्याबरोबर काम करण्याच्या अनुभवाबाबत बोलताना स्वप्नील जोशी म्हणाला, “प्रसाद, सोनाली आणि मी गेली कित्येक वर्षे एकमेकांना ओळखतो आणि आम्ही चांगले मित्र आहोत. पण आम्ही एकमेकांबरोबर काम केलेले नाही. दोनेक वर्षांपूर्वी प्रसाद एक चित्रपट दिग्दर्शित करत होता आणि मी त्यात काम करणार होतो. पण काही कारणामुळे ते काही जुळून आले नाही. मग ‘सुशीला-सुजीत’ची निर्मिती सुरु झाली आणि आम्हीही संधी साधायचीच असे ठरवून टाकले.”

## थोडक्यात



### जिल्हा परिषद शिक्षक करतोय संविधान जागृती

- मुळशीतील वाड्या-वस्त्या, वीट भट्टीवर विजय वडवेराव यांच्याकडून संविधानाचा जागर

**पुणे (आरंभ पर्व) :** 75वा भारतीय संविधान दिन नुकताच साजरा झाला. मात्र, 75 वर्षांत संविधान सामान्य माणसापर्यंत पोहोचले का? हा प्रश्न अनुत्तरित आहे. हे संविधान गावागावात, वाड्या-वस्तीवर पोहोचावे, समाजातील शेवटच्या घटकाला त्याचे महत्व, त्याला मिळालेले अधिकार व त्याची कर्तव्ये त्याला समजावीत यासाठी जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, फुले प्रेमी विजय वडवेराव संविधान जागृती करत आहेत. भारतीय संविधान दिनानिमित्त मुळशी तालुक्यातील रिहे केंद्रांतर्गत येणाऱ्या गोडांबेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व भारतीय संविधानाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. विजय वडवेराव यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिनाचे महत्व सांगितले. शाळा प्रमुख अर्चना मुत्याल यांनी मार्गदर्शन केले. त्यांनतर वडवेराव यांनी शाळेच्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन गावात घरोघरी जाऊन संविधान उद्देशिकेचे वाटप केले. तसेच भारतीय संविधानाविषयी नागरिकांना माहिती देऊन त्यांचे हक्क, कर्तव्य व जबाबदाऱ्या याविषयी माहिती सांगत जनजागृती केली. गोडांबेवाडी कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व वीटभट्ट्या, बांधकाम क्षेत्रातील मजूर व कष्टकरी यांच्या झोपड्यात प्रत्यक्ष जाऊन संविधानाविषयी माहिती दिली. सर्व कुटुंबांना लाडूचा खाऊ देण्यात आला. विजय वडवेराव म्हणाले, "जिल्हा परिषदेत शाळेत शिक्षक, तसेच कवी म्हणून माझी ओळख आहे. भारतातील मुलींची पहिली शाळा भिडेवाडा संदर्भात गेल्या 12 वर्षांपासून जनजागृती व प्रबोधन, प्रचार प्रसाराची चळवळ चालवत आहे. क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई यांच्या कार्याचे आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियान देशभर व देशाबाहेर चालवत आहे. तळागाळातील शेवटच्या कष्टकरी मजूर माणसापर्यंत संविधान पोहोचले पाहिजे."

## दगडखाणींच्या खोदकामाचा पर्जन्यमानावर विपरित परिणाम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पश्चिम घाटातील दगडखाणींच्या खोदकामाचा पर्जन्यमानावर विपरित परिणाम होत आहे, असे मत ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी शनिवारी व्यक्त केले. जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या सामाजिक आणि पर्यावरणीय न्यायासाठी राष्ट्रीय आघाडीने पुण्यात एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमात गाडगीळ बोलत होते. पर्यावरणतज्ज्ञ प्रा. सौम्या दत्ता, विजय परांजपे, प्रफुल्ल सामंतरा, सुनीती सु. र., संतोष ललवाणी या वेळी उपस्थित होते. मेधा पाटकर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला. गाडगीळ म्हणाले, ‘सध्या दगडखाणीचे पेव फुटले आहे. डोंगर खोदून दगड काढले जात आहेत. त्यामुळे अनेक भागात दरड कोसळतात. केरळमध्ये दरड कोसळून चारशेहून अधिक माणसे मेली. त्यानंतर अनेकजण जागे झाले. मी तिथे पूर्वी काम केले आहे. वायनाडमध्ये चहाचे खूप मळे आहेत. सपाट जमिनीवर लोक राहतात. जिथे माणसांनी राहणे योग्य नाही. तिथे मजुरांना राहायला सांगितले जाते. मग दरड कोसळून हे मजूर मृत्युमुखी पडतात.

## तहसीलदारांकडे मागितली दहा लाखांची खंडणी



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

बोगस रेशनिंगकार्ड दिल्या प्रकरणी खेडच्या तहसीलदार ज्योती देवरे यांच्याकडे दहा लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली. खंडणी मागणारे आणि रेशनिंग कार्ड देणारे अशा दोघांची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी असा तक्रारअर्ज तहसीलदार ज्योती देवरे यांनी खेड पोलिस ठाण्यात दिला आहे. त्यानुसार चौकशी सुरु केली असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक पुनाजी जाधव यांनी दिली.

तहसीलदार ज्योती देवरे यांनी दिलेल्या तक्रार अर्जानुसार तहसील कार्यालयात पुरवठा निरिक्षक अधिकारी यांच्या माध्यमातून रेशनिंग कार्ड देण्यात येतात. त्यांच्या निर्गमित असलेल्या सन 2015 ते 2023 दरम्यानच्या रेशनिंग कार्ड मधील एक कार्ड एका लाभार्थीला मिळाले. ते देताना संबंधित अधिकारी यांनी ऑनलाईन चार हजार रुपये घेऊन ते कार्ड दिल्याची तक्रार एका व्यक्तीने केली. त्याचा तपास करत असताना तहसीलदार देवरे यांना काही कार्ड गहाळ झाल्याचे निदर्शनास आले. असा प्रकार घडला आहे असे समजताच, संपर्क करणाऱ्या व्यक्तीने तहसीलदार देवरे यांनाच मोबाईलवर मेसेज करून प्रकरण मिटवायचे असेल तर दहा लाख रुपये द्या, अशी मागणी केली.

तहसीलदार ज्योती देवरे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि दोषींवर कारवाई व्हावी यासाठी सबंधित प्रकरणाबाबत खेड पोलिसात लेखी तक्रार दिली. त्यात खेड तहसील कार्यालयात असलेल्या पुनर्वसन व रोजगार हमी योजनेचे अव्वल कारकून सुनील किसन नंदकर यांच्याही चौकशीची मागणी केली आहे. तसेच रेशन कार्डधारक महेश लक्ष्मण नेहरे यांच्याही नावाचा समावेश करण्यात आला आहे.

दरम्यान, हे प्रकरण मिटवून घेण्यासाठी थेट तहसीलदारांकडे खंडणी मागण्यात आल्याने महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

## मर्क्युरी ट्रेड लिंक्सचे 48.95 कोटी रुपयांचे राइट्स इश्यू 5 डिसेंबरला बंद होणार

- कंपनी १.०८ कोटी रुपयांच्या इश्यू किमतीवर पूर्ण-पेड इक्विटी शेअर जारी करेल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कृषी उत्पादनांच्या व्यापारात गुंतलेल्या अहमदाबाद स्थित मर्क्युरी ट्रेड लिंक्स लि.चा 48.95 कोटी रुपयांचा राईट्स इश्यू 7 नोव्हेंबर 2024 रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडला गेला आहे. हा राइट्स इश्यू 5 डिसेंबर रोजी बंद होणार आहे.

योग्य इश्यूद्वारे जमा केलेला निधी कंपनीच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा भागवण्यासाठी वापरला जाणार आहे.

इश्यू खर्च, इतरांमध्ये सामान्य कॉर्पोरेट कंपनीचे राईट इश्यू 6 नोव्हेंबर 2024 रोजी 60.43 रुपये प्रती शेअर क्लोजिंग शेअर किमतीच्या तुलनेत 44.95 रुपये प्रती शेअर किमतीत ऑफर केले जातात. 6 नोव्हेंबर 2024 रोजी राईट्स इश्यू उघडण्यात आला असून तो 5 डिसेंबर 2024 रोजी बंद होईल. मार्च 2024 पासून कंपनीकडून हा दुसरा राइट इश्यू आहे. कंपनीला 9.90 कोटी रुपये जमा करण्यासाठी ज्याची किंमत 40 रुपये प्रति शेअर आहे.

10 रुपयाच्या दर्शनी मूल्याचे 1,08,90,000 पूर्ण पेड-अप इक्विटी शेअर कंपनी जारी करेल. ज्याची किंमत रुपये 44.95 प्रति इक्विटी शेअर (रु. 34.95 प्रति इक्विटी शेअरच्या प्रीमियमसह) एकूण 48.95 कोटी रुपयांच्या प्रस्तावित इश्यूसाठी हक्क हक्क गुणोत्तर 4:1 वर निश्चित केले आहे. (विक्रमी तारखेला इक्विटी भागधारकांनी धारण केलेल्या प्रत्येक 1 पूर्ण-पेड इक्विटी शेअरसाठी प्रत्येकी 10 रुपये दर्शनी मूल्याचे 4 राइट्स इक्विटी शेअर्स प्रत्येकी 1 पूर्ण पेड इक्विटी शेअर समभागधारकांकडून 24 ऑक्टोबर, 2024 या तारखे पर्यंत उभारण्यात येतील). ऑन-मार्केट राइट्सचा त्याग करण्याची अंतिम तारीख 29 नोव्हेंबर 2024 पर्यंत होती.

मुद्देमालापैकी 48.95 कोटी रुपये, कंपनीच्या खेळत्या भांडवलाच्या गरजेसाठी 36.94 कोटी रुपये, राईट इश्यूच्या खर्चासाठी 25 लाख आणि 11.76 कोटी रुपये सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी असतील.

1985 मध्ये स्थापित झालेल्या मर्क्युरी ट्रेड लिंक्स लि. ही खते, वनस्पती आणि प्राण्यांच्या खाद्यपदार्थांसह विविध कृषी उत्पादनांच्या व्यापारात आघाडीवर आहे. ते कीटकनाशके, तणनाशके आणि बुरशीनाशके तसेच विविध प्रकारचे धान्य आणि बियाणे यांचा व्यापार करतात. त्यांच्या विस्तृत उत्पादन पोर्टफोलिओमध्ये तांदूळ, कॉर्न, मिलो, कापूस बियाणे, सोयाबीन, शेंगदाणे, एरंडेल बियाणे, जवस, सूर्यफूल, नारळ, रेपसीड, बदाम, तीळ, मोहरी, समुद्री बिया आणि द्राक्षाच्या बिया समाविष्ट आहेत.

मार्च 2024ला संपलेल्या 23-24 या वर्षासाठी कंपनीने 13.83 कोटी रुपयांच्या एकूण उत्पन्नाच्या तुलनेत 2796.42 टक्केची वाढ केली आहे. 2023 या वर्षामध्ये 0.48 कोटी रुपये, 2024 या वर्षासाठी निव्वळ नफा 1.14 कोटी रुपये कंपनीला नफा झाला आहे

## जल, जंगल, जमीन क्षेत्राकडे लक्ष देण्याची गरज, शरद पवार यांचे मत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जल, जंगल आणि जमीन या क्षेत्राकडे सध्या लक्ष देण्याची गरज आहे. यातून देशातील बहुतांश समस्या दूर होतील. त्यामुळे भारतीय जैन संघटनेने यात काम करावे, अशी अपेक्षा राष्ट्रवादी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शनिवारी व्यक्त केली. देशात समस्या आली त्यावेळी जैन समाजाने ती समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतला, अशा शब्दांत त्यांनी भारतीय जैन संघटनेच्या कार्याचा गौरव केला. भारतीय जैन संघटनेच्या दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी शरद पवार बोलत होते. यावेळी नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सकल जैन समाज संघटनेचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा, संघटनेचे संस्थापक शांतिलाल मुथा, उद्योजक प्रकाश धारिवाल, गणपत चौधरी, विठ्ठल मणियार, जितोचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष विजय भंडारी, राजेंद्र लुंकड, वालचंद संचेती, राजेश मेहता, वल्लभ भन्साळी, डॉ चैनराज जैन, कोमल जैन, सरला मुथा या वेळी उपस्थित होत्या. शैक्षणिक आणि सामाजिक कामात मागील 40 वर्षांपासून शांतिलाल मुथा आणि भारतीय जैन संघटनेचे मोठे काम केले आहे, असे सांगून पवार म्हणाले, ‘समाजाची सेवा करण्यासाठी जैन समाज कायम प्रयत्नशील आहे. लातूर भूकंपाच्या वेळी समस्या सोडवण्यासाठी सगळ्यात पहिल्यांदा शांतिलाल मुथा यांनी मोठे काम केले. अनाथ मुलांना पुण्यात आणून त्यांना आसरा दिला. त्यानंतर गुजरातमध्ये झालेल्या भूकंपादरम्यान देखील संघटनेने मोठे काम केले. त्यामध्ये पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, अन्न, औषधी यासह विविध समस्या सोडविल्या.’ देशाच्या आर्थिक विकासाच्या वाटचालीत जैन समाजाचे मोठे योगदान आहे. समाज एकविचाराने राहिला.

# झेप्टोची 10 मिनिटांत उत्पादने पोहोचविण्यासाठी पार्क प्लसशी भागीदारी

### संपूर्ण भारतात ८ पेक्षा अधिक ठिकाणी ११ पार्क प्लस कार केअर उत्पादने झेप्टोवर उपलब्ध होणार











**पुणे (दै. आरंभ पर्व)**

त्वरित डिलीव्हरीसाठी ख्यातनाम असलेल्या भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या ग्राहक इंटरनेट ब्रँड झेप्टोने सर्व कार केअर उत्पादनांसाठी हक्काची जागा असलेल्या पार्क प्लस शी हातमिळवणी केली आहे. या अंतर्गत संपूर्ण भारतात आठपेक्षा अधिक ठिकाणी 11 पार्क प्लस कार केअर उत्पादने झेप्टोवर उपलब्ध होणार आहेत. या पहिल्याच प्रकारच्या उपक्रमामुळे क्लिनिंग किट्स, कम्फर्ट ॲक्सेसरीज आणि मेंटेनन्स अवजारांसारख्या उच्च दर्जाच्या उत्पादनांच्या शोधात असलेल्या कारमालकांसाठी नवे अनुभव खुले होणार आहेत. भारतीय रस्त्यावर 5 कोटींपेक्षा अधिक खासगी कार धावत आहेत, त्यामुळे उंची (प्रीमियम) कार केअर उत्पादनांची मागणी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्वरेने होणाऱ्या ई-कॉमर्समुळे भारतीय कार मालकांना अशा उत्पादनांसाठी अधिक सुलभता आणि डिलीव्हरीची अपेक्षा असते. झेप्टो आणि पार्क प्लस हे सुलभ आणि किफायती अशी कार केअर उत्पादने उपलब्ध करून देण्यासाठी हातात हात घालून काम करत आहेत. या भागीदारीविषयी बोलताना पार्क प्लस चे संस्थापक आणि सीईओ श्री. अमित लखोटिया म्हणाले, “पार्क प्लस मध्ये नाविन्यपूर्ण आणि ग्राहकानुकूल उत्पादने उपलब्ध करून देऊन कार मालकीचा अनुभव अधिक सोपे करणे हे आमचे ध्येय आहे. झेप्टोसोबत भागीदारी करणे हे आमच्यासाठी एक मोठे पुढचे पाऊल आहे, त्यामुळे निवडक 15 प्रीमियम कार केअर उत्पादने अधिक व्यापक लोकांपर्यंत नेणे आम्हाला शक्य होणार आहे. कारमालकांना आता उच्च दर्जाची कार केअर उत्पादने शोधण्यासाठी अनेक दुकानांत जाण्याची किंवा धडपड करण्याची गरज नाही. वाहनांच्या देखभालीसाठी लागणारी प्रत्येक वस्तू आता त्यांना एकाच ठिकाणी मिळू शकेल, ती त्यांना त्यांच्या उंबरठ्यावरच मिळेल. पुढील 3 महिन्यांत झेप्टोवरील आमची कार केअर उत्पादने 150 पेक्षा अधिक करण्याचे आमचे लक्ष्य आहे.” झेप्टोचे मुख्य चीफ अधिकारी चंदन मेंडिरट्टा म्हणाले, पार्क प्लस ची उच्च दर्जाची कार केअर उत्पादने थेट ग्राहकांच्या उंबरठ्यापर्यंत आणण्यासाठी सहयोग करताना आम्हाला आनंद होत आहे. वेग आणि सुविधा ही झेप्टोच्या केंद्रस्थानी असून या भागीदारीमुळे आम्हाला कार देखभालीच्या अत्यावश्यक वस्तूंचा समावेश करून आमच्या उत्पादनांची मालिका विस्तार करता येईल. हे शक्य केल्याबद्दल आम्ही आमच्या विक्रेत्यांचे आभार मानतो. या प्लॅटफॉर्मवर पार्क प्लस उत्पादने उपलब्ध झाल्यामुळे वापरकर्त्यांना आता या वस्तू वेगाने आणि विश्वासाने सहजपणे मिळू शकतील, ज्यासाठी झेप्टोची ओळख आहे. त्यामुळे त्यांचा एकूण खरेदीचा अनुभव समृद्ध होतो.” झेप्टो वर पार्क प्लस उत्पादनांची पडलेली भर ही अतुलनीय सोयी आणि वेगासह निवडक दैनंदिन जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्याच्या कंपनीचे समर्पण अधोरेखित होते.झेप्टोच्या सेवा क्षेत्रातील कार मालक आता प्रीमियम कार केअर वस्तू सहजपणे मिळवू शकतील व त्या त्यांच्या दारापर्यंत त्वरेने आणि विना कटकट वितरित केल्या जातील.

### केंद्रीय शिक्षणमंत्री श्री. धर्मेंद्र प्रधान यांनी भारतातील शिक्षकांना भविष्यासाठी सुसज्ज कौशल्ये देऊन सबल करण्यासाठी

# भारती एअरटेल फाऊंडेशनच्या 'द टीचर ॲप' या उपक्रमाचे अनावरण केले

- द टीचर ॲप मोफत, उच्च-गुणवत्तेची, संवादात्मक डिजिटल संसाधने प्रदान करून विविध शिक्षण शिकण्याच्या शैलींना पाठबळ देते.
- नाविन्यपूर्ण आणि फील्ड-चाचणी पद्धतींसह शिक्षकांना सक्षम करून त्यांना भविष्यातील गतिशील वर्गांसाठी तयार करते जे राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत आहे
- भारती एअरटेल फाऊंडेशनची बांधिलकी दर्शविणारे हे ॲप शिक्षणात बदल करण्यासाठी 12 राज्यांमधील भागीदारी आणि तंत्रज्ञान (टेक इनोव्हेशन) मध्ये परिवर्तन घडवून आणेल




**दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारती एअरटेल फाऊंडेशन ही भारती एंटरप्रायझेसची सेवाभावी शाखा आहे. आज तिने टीचर ॲप लाँच केले आहे. टीचर ॲप एक असे अभिनव डिजिटल प्लॅटफॉर्म आहे ज्याचे डिझाइन अशा पद्धतीने केले गेले आहे जेणेकरून 21व्या शतकातील वर्गांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना भविष्यासाठी तयार कौशल्यांनी सुसज्ज करून भारतातील शिक्षणात क्रांती घडवून आणता येईल. भारत सरकारचे केंद्रीय शिक्षणमंत्री श्री. धर्मेंद्र प्रधान यांनी दिल्लीतील इंडिया हॅबिटॅट सेंटर मध्ये आयोजित लाँच कार्यक्रमात या प्लॅटफॉर्मचे अनावरण केले. यावेळी भारती एंटरप्रायझेसचे उपाध्यक्ष श्री. राकेश भारती मित्तल, भारती एअरटेल फाऊंडेशनच्या सीईओ मिस. ममता सैकिया यांच्यासोबत शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि बीएडचे विद्यार्थी उपस्थित होते.

वास्तविक अनुभव आणि शिक्षकांसमोर उभ्या असलेल्या आव्हानांच्या सखोल आकलनाच्या आधारे, भारती एअरटेल फाऊंडेशनने टीचरॲपची संकल्पना मांडली. टीचरॲप एक असे प्लॅटफॉर्म आहे जे अभिनव डिजिटल संसाधनांद्वारे शिक्षकांना वेळोवेळी पडताळलेल्या आणि भविष्यासाठी तयार अशा कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. शिक्षकांकडून थेट माहिती मिळवून विकसित केलेले हे वापरकर्ता केंद्रित, मोफत ॲप वेब, आयओएस आणि अँड्रॉइड वर उपलब्ध असून देशभरातील शिक्षकांसाठी सुलभ प्रवेश सुनिश्चित करते. हे प्लॅटफॉर्म 260+ तासांची उच्च गुणवत्तेची संसाधने प्रदान करते, जे निर्माण आणि तयार, दोन्ही केले गेले आहे. त्यात सामील आहेत अभ्यासक्रम, लर्निंग बाइट्स, छोटे व्हिडिओ, पॉडकास्ट आणि संवादात्मक वेबिनारचे स्वरूप (इंटरॅक्टिव्ह वेबिनार फॉरमॅट) जसे की विषयगत फेस्ट, वेबिनार, स्पर्धा आणि क्विझ. हे सर्व भविष्यात सुसज्ज राहण्याला चालना देण्यासाठी, शालेय पद्धती वाढविण्यासाठी आणि वर्गामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी डिझाइन केले आहे. याव्यतिरिक्त, ॲपमध्ये व्यावहारिक वर्ग धोरणे प्रदान करणारी आणि त्यांच्या अपवादात्मक प्रभाव कथांवर प्रकाश टाकून शिक्षकांचा समुदाय तयार करण्याचे उद्दीष्ट ठेवणारी थेट तज्ज्ञ सत्रे देखील आहेत. या प्लॅटफॉर्मवर 900+ तासांची सामग्री असलेला टीचिंग किट्स नावाचा एक असाधारण विभाग आहे. हे वैशिष्ट्य इतरांमध्ये शिक्षकांना वर्गात प्रदान करण्यासाठी शिकवण्याचे व्हिडिओ, प्रकल्पावर आधारित शिक्षण उपक्रम, वर्कशीट, लेसन प्लॅन आणि क्वेश्चन बँक यासोबत साधनांसह सहाय्य करण्यासाठी डिझाइन केले गेले आहे. टीचर ॲप ने शाळांचे सुरक्षित आणि आनंदी शिक्षण स्थळांमध्ये रूपांतर करण्याचे उद्देश ठेवले आहे आणि शिक्षकांच्या वाढीस मदत करून शाळांचे नेते व प्रशासक यांना सुद्धा सबल करत आहे. हे ॲप राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असून भविष्यासाठी तयार शिक्षक निर्माण करण्याचे उद्दीष्ट ॲपने ठेवलेले आहे. हे शिक्षक, शिक्षणाच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी सुसज्ज असतील.

श्री. धर्मेंद्र प्रधान, भारताचे शिक्षणमंत्री, शिक्षकांच्या क्षमता वाढीसाठी निर्मित ॲपच्या लाँच प्रसंगी म्हणाले की भावी पिढी घडविणारे शिक्षक हेच खरे कर्मयोगी आहेत. शिक्षणमंत्री श्री. धर्मेंद्र प्रधान म्हणाले, एनइपी 2020 च्या भावनेतून शिक्षकांच्या सातत्यपूर्ण क्षमता वाढीसाठी आम्ही नवोपक्रम आणि तंत्रज्ञान यांचा वापर करीत आहोत. श्री. धर्मेंद्र प्रधान यांनी आज द टीचर ॲपचे अनावरण केले आणि जमलेल्या लोकांसमोर 'शिक्षकांची उन्नती, भारताची उन्नती' या विषयावर भाष्य केले. हे ॲप भारती एअरटेल फाऊंडेशनने विकसित केले आहे आणि शिक्षकांच्या क्षमता वाढीसाठी समर्पित आहे. श्री. धर्मेंद्र प्रधान म्हणाले की, हे ॲप सातत्यपूर्ण क्षमता वाढीद्वारे आमच्या शिक्षकांना सबल करण्यात खूप प्रगती करणार आहे आणि त्यात अभिनव अभ्यासक्रम सामग्री, तंत्रज्ञान आणि समुदाय बांधणी वैशिष्ट्ये यांचा वापर केला जाणार आहे. ते म्हणाले की, भावी पिढी घडवणारे शिक्षक हेच खरे कर्मयोगी आहेत, आणि #एनइपी2020 भावनेतून शिक्षकांच्या सातत्यपूर्ण क्षमता वाढीवर सरकार अभूतपूर्व भर देत आहे. ते असेही म्हणाले की, शिक्षकांना सबल करण्यासाठी आम्ही नवोपक्रम आणि तंत्रज्ञानाचा वापर करीत आहोत. ते पुढे म्हणाले की, सुशिक्षित शिक्षक सुशिक्षित विद्यार्थी घडवतात. ज्ञानाने प्रोत्साहित 21व्या शतकात भारताची वाटचाल सुरू असताना, शिक्षक हे भविष्यातील संधी मॅप करण्यात आणि आपले तरूण विकास गाथेचे नेतृत्व करीत आहे हे सुनिश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील, असे ते म्हणाले.

श्री. राकेश भारती मित्तल, उपाध्यक्ष, भारती एंटरप्रायझेस, यांनी टीचर ॲपच्या असाधारण फायद्यांविषयी सांगितले की, "जागतिक आर्थिक नेत्याच्या रूपात भारताचा उत्कर्ष व्हावा म्हणून हे महत्वाचे आहे की आपल्या शिक्षण व्यवस्थेने शिक्षकांना कल्पकता, गंभीर विचारसरणी आणि नवोपक्रम यांना चालना देण्यासाठी सुसज्ज केले पाहिजे. टीचर ॲप हे या दिशेने एक निर्णायक पाऊल आहे आणि हे शिक्षकांना जागतिक दर्जाची संसाधने आणि उत्कृष्ट पद्धती उपलब्ध करून देते ज्यामुळे त्यांना अपवादात्मक शिकविण्याचे अनुभव प्रदान करता येतात. आपल्या देशाचे भविष्य घडविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजाविणाऱ्या भारतातील अथक शिक्षकांना आम्ही हे प्लॅटफॉर्म समर्पित करीत आहोत. गेल्या 25 वर्षांत भारती एअरटेल फाऊंडेशनने शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून 6 मिलियनहून अधिक लोकांच्या आयुष्याला प्रभावित केलेले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून, शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक सक्षमीकरणाच्या मिशनमध्ये श्रेष्ठत्व मिळविण्यासाठी सुसज्ज करण्याची बांधिलकी भारती एअरटेल फाऊंडेशन पुन्हा आवर्जून सांगत आहे." या प्रवर्तनात्मक उपक्रमाच्या माध्यमातून, भारती एअरटेल फाऊंडेशन शिक्षणातील नवोपक्रमाला चालना देण्यासाठी, भारताचे भविष्य घडविण्यासाठी शिक्षकांना सक्षम करण्याची आपली बांधिलकी पुन्हा आवर्जून सांगत आहे.

# थोडक्यात

## 'महाराष्ट्राची हास्यजत्रा', कॉमेडीची हॅटट्रीक




**पुणे (आरंभ पर्व) :** सोनी मराठी वाहिनीवरील 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाने महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. या कार्यक्रमाचे अनेक चाहते आहेत आणि यांमध्ये अनेक दिग्गज नामवंतांचाही समावेश आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' ह्या कार्यक्रमची नवी पर्वे, त्यांतले नवे विषय, नवनवीन प्रहसने यांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन होत असते. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' आता कॉमेडीची हॅटट्रीक घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या नव्या पर्वामध्ये आपल्याला नक्कीच नवीन काहीतरी पाहायला मिळणार आहे. तब्बल 6 वर्षांहून जास्त काळ 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम प्रेक्षकांचे मनोरंजन करतो आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' ह्या कार्यक्रमाचे आजवर 800पेक्षा अधिक भाग प्रसारित झाले आहेत. ह्या कार्यक्रमाने प्रेक्षकांच्या मनात घर केले असून प्रेक्षकांनीही त्यांच्या या आवडत्या कार्यक्रमाला भरपूर प्रेम दिले आहे. 2 डिसेंबरपासून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा', कॉमेडीची हॅटट्रीक हे नवे पर्व सोनी मराठी वाहिनीवर सुरु होणार आहे. या पर्वाचे वैशिष्ट्य काय असणार आहे, याबद्दल 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाचे निर्माते आणि दिग्दर्शक सचिन गोस्वामी म्हणाले, "प्रेक्षकांनी यापूर्वी प्रहसनांच्या अनेक मालिका पाहिल्या. यांतून अनेक पात्रे लोकप्रिय झाली, पण ती पात्रे फक्त त्या-त्या मालिकेमध्ये पाहिली. या नव्या पर्वामध्ये वेगवेगळ्या मालिकांमधली पात्रे एकमेकांच्या मालिकांमध्ये जाऊन धमाल करताना प्रेक्षकांना पाहायला मिळतील. ह्या पर्वात हा नवा प्रयोग आपल्याला पाहता येईल. यातून नक्कीच मोठा हास्यकल्लोळ निर्माण होईल आणि तो प्रेक्षकांना नक्कीच आवडेल अशी मला खात्री आहे."

## मेरिलची हार्ट व्हॉल्व्ह नावीन्यपूर्ण झेप



**पुणे (आरंभ पर्व) :** मेरिलची हार्ट व्हॉल्व्ह नावीन्यपूर्ण झेप "Myval Octapro THV" GISE 2024 आणि PCR लंडन व्हॉल्व्हमध्ये प्रदर्शित मेरिल लाइफ सायन्सेस, एक अग्रगण्य जागतिक मेद-तंत्र कंपनी जी हृदय-वाहिकीय आणि संरचनात्मक हृदय उपायांमध्ये विशेषीकृत आहे, ने GISE 2024 (इटालियन इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजी सोसायटीची राष्ट्रीय परिषद) आणि PCR लंडन वाल्व 2024 मध्ये त्यांच्या Myval Octapro ट्रान्सकॅथेटर हृदय वाल्व (THV) च्या लॉन्चसह एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. या प्रतिष्ठित वैज्ञानिक इव्हेंट्सने मेरिलला स्ट्रक्चरल हार्ट केअरमध्ये प्रगती करण्यासाठी आपली वचनबद्धता प्रदर्शित करण्यासाठी एक आदर्श व्यासपीठ प्रदान केले. मायवाल THV मालिका, जी ट्रान्सकॅथेटर ऑर्टिक व्हाल्व रिप्लेसमेंट (TAVR) प्रक्रियांसाठीच्या त्यांच्या नाविन्यपूर्ण योगदानांसाठी ओळखली जाते, मायवाल ऑक्टाप्रो THV सह नवीन मापदंड ठरवत आहे. या नवीनतम आवृत्तीत कमी फ्रेम फॉरशॉर्टनिंग, ऑपरेटर नियंत्रण वाढवणे आणि सुधारित प्रक्रियात्मक अंदाजासाठी अचूक तैनाती करण्याची क्षमता समाविष्ट आहे. याशिवाय, त्याचा सर्वसमावेशक आकार मेट्रिक्स, ज्यामध्ये पारंपरिक, माध्यमिक आणि अतिरिक्त-लार्ज व्हल्व आकारांचा समावेश आहे.

## डॉक्टरांनी पीओईएम शस्त्रक्रिया करून वाचवले 34 वर्षीय रुग्णाचे प्राण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अगदी नुकत्याच घडलेल्या घटने मध्ये पुण्यातील बाणेर येथे असलेल्या मणिपाल हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी गिळण्यास त्रास होत असलेल्या दुर्मिळ अशा समस्येशी झगडणाऱ्या 34 वर्षीय रुग्णावर यशस्वी उपचार केले आहेत. हा रुग्ण डिसफॅगिया या आजाराने त्रस्त होता आणि त्यामुळे त्याला गिळण्यास त्रास हाणे, उलट्या होणे, मळमळणे, भूक न लागणे अशी लक्षणे दिसून येत होती त्याच बरोबर गेल्या सहा महिन्यांपासून हा त्रास असल्याने त्याच्या जीवनशैलीवर याचा घातक परिणाम होत होता. त्याच बरोबर त्याची ही परिस्थिती पहाता त्याच्यावर एसोफॅगो-गॅस्ट्रो-ड्युओडेनोस्कोपी (ओजीडी स्कॉपी) ही करण्यात आली होती. यातून असे दिसून येते की त्याला अचलसिया कार्डियाचा सुध्दा त्रास आहे. त्याची तपासणी केल्यावर डॉ. प्रसाद भाटे आणि त्यांच्या चमूने त्याच्यावर पर ओरल एन्डोस्कोपिक म्योटोमी (पीओईएम) प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. यावेळी अचलसिया कार्डिया हा आणखी एक दुर्मिळ असा लोअर एसोफेजियल स्फिंक्टर (एलईएस) आजार झाल्याचे निदान करण्यात आले. या आजारातील एसोफेगल रक्तवाहिन्या या घट्ट झाल्यामुळे एलईएस प्रसरण पावत नव्हते ज्यामुळे सेवन केलेले अन्न आणि द्रवपदार्थ हे पोटात जातच नव्हते. जगभरात दर 1 लाख लोकांमध्ये अचल्सिया कार्डियाच्या केवळ 8-12 केसेसच सापडतात. या केस बद्दल माहिती देतांना पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल चे कन्सल्टंट गॅस्ट्रोअॅन्ट्रोलॉजिस्ट डॉ. प्रसाद भाटे यांनी सांगितले " अचल्सिया कार्डिया ही खूपच जटील केस असल्याने त्यावर उपचार करणे खूपच कठीण काम असते. पीओईएम पध्दती ही मिनीमली इन्व्हेझिव्ह अशी एन्डोस्कोपिक प्रक्रिया असल्याने ओपन सर्जरी करण्याची शक्यता खूपच कमी होते. यामुळे रुग्ण लवकर बरा होतो आणि सुधारीत निष्कर्श प्राप्त होतो. आमचा रुग्ण तर सर्जरी झाल्यापासून अगदी दोन तासात पाणी पिऊ लागला आणि काही दिवसातच द्रवरुपातील अन्न आणि दहा दिवसात मऊ भोजनही घेऊ लागला.



## संगीतमय चित्रपट 'संगीत मानापमान' चा भव्य म्युझिक लाँच सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न !

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मायानगरी मुंबईत, जिओ स्टुडिओज प्रस्तुत आगामी मॅग्नम ऑपस संगीतमय चित्रपट "संगीत मानापमान" चा ग्रँड म्यूझिक लाँच सोहळा पार पडला. 10 जानेवारी 2025 ला "संगीत मानापमान" हा सिनेमा आपल्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. हा सिनेमा म्हणजे कला, संस्कृती आणि संगीताचा एक उत्सव.




खाडिलकरांच्या 114 वर्ष जुन्या अभिजात नाटकावरून प्रेरित, "संगीत मानापमान" हा सिनेमा कट्यार काळजात घुसली तसेच आणि...डॉ. काशिनाथ घाणेकर यांसारख्या प्रतिष्ठित चित्रपटांचा समृद्ध वारसा पुढे नेत आहे. नयनरम्य दृश्य, अस्सल संगीतमय कथाकथन आणि एका पेक्षा एक कलाकार आश्वासन देतायत की हा सिनेमा नक्कीच एक अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे.

दिग्गज संगीतकार शंकर-एहसान-लॉय ह्यांनी या चित्रपटासाठी मंत्रमुग्ध करणारी एकूण 14 गाणी कंपोज केली आहेत, ह्या गाण्यांना 18 नामवंत गायकांनी जसे शंकर महादेवन, सोनू निगम, राहुल देशपांडे, महेश काळे, अवधूत गुप्ते, बेला शेंडे, प्रियांका बर्वे, आर्या आंबेकर, प्रतिभा सिंग बघेल, जसराज जोशी, आनंद भाटे, शौनक अभिषेकी, सावनी रवींद्र, हृषीकेश बडवे, अस्मिता चिंचाळकर, कृष्णा बोंगाणे, शिवम महादेवन आणि श्रीनिधी घटाटे ह्यांनी आपला आवाज दिला आहे. अभिमानाची गोष्ट म्हणजे यातले सात गायक हे राष्ट्रीय पुरस्कार विजेते गायक आहेत.

"संगीत मानापमान" च्या या भव्यदिव्य म्युझिक लॉन्चच्या कार्यक्रमामध्ये संपूर्ण चित्रपटाची स्टारकास्ट उपस्थित होती. इतकच नव्हे तर गायकांद्वारा लाईव्ह परफॉर्मन्सचा आस्वाद सुद्धा प्रेक्षकांना घेता आला. संगीत मानापमान या मूळ नाटकातील गाजलेल्या गाण्यांचे आणि चित्रपटातील नवीन रचनांचे मिश्रण ह्यावेळी पहायला मिळाले, प्रत्येक गायकाने आपलं गाणं स्टेजवर सादर करून प्रेक्षकांना आपल्या मधुर सुरांनी एका वेगळ्याच जगात असल्याचा अनुभव दिला.

मीडिया अँड कंटेंट बिझनेस, RIL च्या अध्यक्षा ज्योती देशपांडे म्हणाल्या :- "जिओ स्टुडिओजमध्ये, आम्ही काही तरी विलक्षण आणि भारताची सांस्कृतिक समृद्धी साजरी करणाऱ्या कथा मोठ्या पडद्यावर सादर करण्यास उत्सुक आहोत. संगीत मानापमान ही मराठी संगीत रंगभूमीच्या शाश्वत कलेला केलेले अभिवादन आहे, त्यामुळे सुमधुर असं संगीत आणि चित्रपटाची कथा महाराष्ट्रच नव्हे तर महाराष्ट्र बाहेरील प्रेक्षकांना सुद्धा नक्कीच आवडेल. शंकर-एहसान-लॉय यांच्या अलौकिक टॅलेंट आणि बुद्धिमत्तेसह, संगीत कसं सगळ्यांना एकत्रित करतं आणि प्रेरणा देऊ शकतं याचं हा चित्रपट एक उत्तम उदाहरण आहे. संगीत मानापमान व्दारे कलेचा एक उत्कृष्ट नमुना जागतिक स्तरावर प्रेक्षकांसमोर सादर करताना आम्हाला खूप अभिमान वाटतोय."

# अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर कॉम्प्लेक्सचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलने आज आपले अत्याधुनिक हाय-टेक ऑपरेशन थिएटर (OT) कॉम्प्लेक्सचे उद्घाटन केले, जे जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या अत्याधुनिक सुविधेचे उद्घाटन सौ. राजश्री बिर्ला, अध्यक्षा, आदित्य बिर्ला फाऊंडेशन, तसेच श्री. के.के. महेश्वरी, संचालक, आदित्य बिर्ला ग्रुप यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

ADITYA BIRLA MEMORIAL HOSPITAL

नवीन सहा ऑपरेशन थिएटरच्या समावेशामुळे आता आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये एकूण 15 ऑपरेशन थिएटर ( OT ) उपलब्ध आहेत. ही सुविधा प्रगत शस्त्रक्रिया प्रक्रियांसाठी वाढत्या मागणीला प्रतिसाद देण्यासाठी तयार करण्यात आली आहे, ज्यामुळे रूग्णांना वेळेवर आणि उत्तम दर्जाच्या शस्त्रक्रिया सेवा मिळतील.

हा उपक्रम प्रगत आरोग्यसेवा सेवांचा लाभ समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने हॉस्पिटलच्या कटिबद्धतेचा दाखला देतो. नवीन ऑपरेशन थिएटर ( OT ) कॉम्प्लेक्स उत्कृष्ट शस्त्रक्रिया निकाल, जलद रिकव्हरी वेळा आणि सोयीस्कर रुग्ण अनुभव यासाठी तयार केले गेले आहे.नवीन लॉन्च केलेल्या ऑपरेशन थिएटर कॉम्प्लेक्समध्ये सात अत्याधुनिक ऑपरेशन थिएटरचा समावेश आहे, ज्यात नुकत्याच उद्घाटन केलेल्या सहा ऑपरेशन थिएटर चा समावेश आहे. या प्रत्येक ऑपरेशन थिएटर मध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षितता, अचूकता आणि रुग्णसेवेसाठी उच्च दर्जाची सुविधा आहे.

या सुविधांमध्ये प्रगत इमेजिंग आणि नेव्हिगेशन प्रणालीसह विशेष न्यूरो ऑपरेशन थिएटर, जलद रिकव्हरी आणि कमी गुंतागुंत यासाठी मिनिमली इनवेसिव्ह सर्जरी ऑपरेशन थिएटर दोन विशेष ट्रान्सप्लांट ऑपरेशन थिएटर, ज्यामुळे अवयव प्रत्यारोपण सुलभ होते. अधिक अचूकतेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज रोबोटिक सर्जरी ऑपरेशन थिएटर, प्रगत तंत्रज्ञान असलेला विशेष नेत्र ऑपरेशन थिएटर, हाय-टेक इंटिग्रेटेड ऑपरेशन थिएटर, जे मल्टिडिसिप्लिनरी प्रक्रियांना समर्थन देते. उन्नत उपचारांसाठी सामर्थ्य सौ. राजश्री बिर्ला म्हणाल्या की "या अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर कॉम्प्लेक्सच्या उद्घाटनामुळे, आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल आरोग्यसेवेत उत्कृष्टता साध्य करण्याच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते. अशा अत्याधुनिक सुविधांनी सज्ज होऊन, आम्ही समाजाला सर्वोत्तम आरोग्य सेवा देण्यास सक्षम होऊ."

श्री. पामेश गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी, आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल, म्हणाले की "सहा नवीन ऑपरेशन थिएटर च्या समावेशामुळे, ऑपरेशन थिएटर ची संख्या आता 15 झाली आहे, ज्यामुळे आमचे हॉस्पिटल विविध प्रकारच्या शस्त्रक्रियांसाठी अधिक सज्ज झाले आहे. ही सुविधा आमच्या डॉक्टरांना जटिल शस्त्रक्रिया अचूकतेने करण्यास सक्षम करते आणि उच्च दर्जाच्या आरोग्यसेवेचे आमचे ध्येय बळकट करते."

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.